# परिसिट्ठं एकं– वेय्याकरण (व्याकरण)

## १) सरं च व्यञ्जनं च वग्गिकरणं

(स्वर आणि व्यंजन वर्गीकरण)

### सर (स्वर)

पालि भाषेमध्ये आठ स्वर आहेत – अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ.

स्वरांचे तीन भागांमध्ये वर्गीकरण करण्यात येते.

१) रस्स सर अर्थात ऱ्हस्व स्वर – अ, इ, उ

२) दीघ सर अर्थात दीर्घ स्वर – आ, ई, ऊ

३) मज्झिम सर अर्थात मध्यम स्वर – ए, ओ

### व्यञ्जन (व्यंजन)

| पकारो | वग्गो | कठोर | मुदु | अनुनासिक |
|---|---|---|---|---|
| १. कण्ठ्य | क – वग्गो | क, ख | ग, घ | ङ (.) |
| २. तालव्य | च – वग्गो | च, छ | ज, झ | ञ (.) |
| ३. मुर्द्धन्य | ट – वग्गो | ट, ठ | ड, ढ | ण (.) |
| ४. दन्त्य | त– वग्गो | त, थ | द, ध | न (.) |
| ५. ओष्ठ्य | प – वग्गो | प, फ | ब, भ | म (.) |
| ६. अन्त | | य, र, ल, व, ळ | | |
| ७. उष्माक्षर | | स | | |
| ८. प्राणध्वनी | | ह | | |
| ९. निग्गहीत | | अं (.) | | |

### वण्णमाला (वर्णमाला)

आपल्या मुखातून जे मूळ ध्वनी बाहेर पडतात त्यांना वण्ण (वर्ण) असे म्हणतात. पालि भाषेमध्ये ८ स्वर आणि ३३ व्यंजने आहेत. असे एकूण ४१ वर्ण आहेत.

### सरपरिवत्तनं (स्वर परिवर्तन)

१) मराठीतील किंवा संस्कृतातील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ, अः हे स्वर पालि भाषेत आढळत नाहीत. 'ऋ' ऐवजी काही ठिकाणी 'अ,' काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ ऐवजी अ – कृषि – कसि, घृत – घत, मृत – मत, श्रृंखला – संखला इत्यादी

ऋ ऐवजी इ – कृमि – किमी, ऋण– इण, श्रृंग – सिंग, तृण – तिण, इत्यादी

ऋ ऐवजी उ – ऋतु – उतु, ऋषभ – उसभ, मृदु –मुदु, मृषा – मुसा इत्यादी

२)	लृ - मराठीत किंवा संस्कृतात फार क्वचितच ठिकाणी आढळतो.
पालि भाषेत त्याचा सर्वथा अभाव आहे.

३)	ऐ ऐवजी ए होतो - तैल - तेल, ऐरावत- एरावत, शैल - सेल, वैशाख - वेसाख इत्यादी
ऐ ऐवजी इ होतो - ऐश्वर्य - इस्सरिव, सैन्धव - सिन्धव, वैभव - विभव इत्यादी.

४)	औ ऐवजी ओ होतो - औषध - ओसध, गौतम -गोतम, पौर -पोर, औदारिक - ओदारिक इत्यादी
औ ऐवजी अ होतो - सौम्य - सम्म
औ ऐवजी आ होतो - गौरव - गारव
औ ऐवजी उ होतो - मौत्तिक- मुत्तिक, औधत्व - उद्धच्च, औत्सुक्य - उस्सुक्कं

## २) व्यञ्जन परिवत्तनं (व्यंजन परिवर्तन)

१)	पालिमध्ये **श** आणि **ष** हे ध्वनी नाहीत. त्याऐवजी 'स' चा उपयोग केला जातो.
(श, ष), स - शेष - सेस, आकाश - आकास, (श, ष, छ) - शावक -छावक, षष्ठ - छट्ठ.

२)	पालि भाषेत कोणतेही पद हलन्त अर्थात व्यंजनान्त नसते.
भगवा (न्) - भगवा, गुणवा (न्) - गुणवा, या व (त्) - याव विद्यु(त्)- विज्जु, पश्चा(त्) - पच्छा.

३)	पालि भाषेत अन्त्य म च्या स्थानी नेहमी अनुस्वार (.)असतो.
चित्तम् - चित्तं, सत्यम् -सच्चं, तीर्थम् - तित्थं

४)	पालिभाषेत विसर्गाचा (:) प्रयोग होत नाही. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये '**ओ**' होतो.
इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.
बुद्धः- बुद्धो, कः - को, एष - एसो.

५)	विसर्गाच्या पुढे जर स, श, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी **स** होतो.
दु:सह-दुस्सह, नि:शोक - निस्सोक.

६)	पालिभाषेत रकार (्र) चा अभाव आहे. उदा. ब्राह्मण - बाह्मण, ब्रह्म - बह्मा.

अ)	सर्व ठिकाणी संयुक्त व्यंजनातील **र** चा लोप होतो व आलेला वर्ण द्विवित्व पावतो.
कर्म - कम्म, कर्ण -कण्ण, पर्ण - पण्ण, वर्ण - वण्ण, वर्ग -वग्ग, धर्म -धम्म, चक्र - चक्क, सर्व - सब्ब, पर्वत - पब्बतो.

आ)	मराठी किंवा संस्कृतमधील शब्दांच्या आरंभी **र** युक्त जोडाक्षर असल्यास पालित त्या र चा लोप होतो. परंतु उरलेला वर्ण द्वित्व पावत नाही.
प्रजा - पजा, ग्राम-गाम, प्रिय -पिय, ग्रंथ - गन्थ, प्रकार - पकार, प्रपंच- पपंच(पपञ्च)

इ)	**र्य** बद्दल **रिय** होतो व **र्य** मागील दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
भार्या - भरिया, सूर्य -सुरिय, आर्य - अरिय, कदर्य - कदरिय.

७)	अ) दीर्घ स्वराच्या पुढे संयुक्त व्यंजन किंवा अनुस्वार आल्यास दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
तीर्थ- तित्थं, मार्दव -मद्दिवं, ईश्वर - इस्सर, नदीम् - नदिं, शालम् - सालं, कुर्म - कुम्म, पराक्रम - परक्कमं
आ) ऱ्हस्व स्वरावरील अनुस्वाराचा लोप होऊन तो ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो व दीर्घ स्वरावर अनुस्वार आला असेल तर तो दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो. उदा.
सिंह- सीह, विंशति - वीसति, मांस- मंस, पांशु -पांसू.

८)	पदातील आदि **क्ष** चा **ख** होतो. उदा. क्षीर-खीर, क्षेम-खेम

९)	पदातील मध्य क्ष चा काही ठिकाणी **क्ख** तर काही ठिकाणी **च्छ** होतो.

दक्षिण - दक्खिण, मोक्ष - मोक्ख, पक्ष -पक्ख, अक्षि - अच्छि किंवा अक्खि.

१०) ड, ढ चा अनुक्रमे **ळ** किंवा **ळ्ह** होतो. उदा.
गुड - गुळ, दाडिम - दाळिम, षोडस - सोळस, क्रीडा - कीळा, तडाग-तळाक, आषाढ - आसाळ्ह.

११) जोडाक्षरात शेवटचे व्यंजन म्, न्, य् किंवा व् असेल तर त्याचा लोप होतो व उरलेल्यांचे द्वित्व होतो. युग्म-युग्ग, नग्न - नग्ग, सौम्य - सम्म, अध्वा - अद्धा. परंतु म, न, य, व हे वर्ण **ह** शी संयुक्त असतील तर त्याचा लोप होत नाही. पण म, न, य, व बदलते. सह्य - सय्ह, परंतु ब्राह्मण व ब्रह्म याऐवजी बाह्मण, बह्म होतात. ब्राह्मण आणि ब्रह्म हे शब्द पालिमधील नाहीत.

१२) जोडाक्षरातील **व** चा ब होतो व त्याचे द्वित्व होते. उदा. सर्व-सब्ब, पर्वत -पब्बत.

**१३) जोडाक्षरांचे पालि शब्दातील इतर काही बद्दल पुढील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र | जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, थ्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ<br>त्याग - चाग<br>युति - जुति<br>ध्यान - झान | च्च, च्छ, ज्ज, ज्झ<br>नृत्य - नच्च<br>मद्य - मज्ज<br>तत्थ - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ, ट्ठ<br>स्तुति - थुति<br>स्थान - ठान | अष्ठ - अट्ठ<br>गृहस्थ - गहट्ठ<br>काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्च, प्स, त्स | -- | च्छ,<br>आश्चर्य - अच्छरिय<br>अप्सरा - अच्छरा<br>वत्स - वच्छ |
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख<br>स्कन्ध - खन्ध<br>क्षान्ति - खन्ति | क्ख<br>भिक्षू - भिक्खू<br>शुष्क - सुक्ख |
| ५) | क्ष | छ<br>क्षुब्ध - छुद्ध | च्छ<br>इक्षु - उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ<br>स्पदन - फन्दन | प्फ<br>पुष्प - पुप्फ |
| ७) | न्य, ण्य, ज्ञ | ञ<br>न्याय - ञाय | ञ्ञ<br>कन्या - कञ्ञा<br>प्रज्ञा - पञ्ञा<br>अरण्य - अरञ्ञ |
| ८) | ष्ण | | ण्ह<br>उष्ण - उण्ह |

## ३) काळ प्रत्यय

### पच्चुपन्नकाल (वर्तमानकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उत्तम पुरिस) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (मज्झिम पुरिस) | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (पठम पुरिस) | (सो, सा, तं) ति | (ते, ता, तानि) अन्ति |

### अतीतकाल (भूतकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इ | (ते, ता, तानि) इंसु, उं |

### अनागतकाल (भविष्यकाळ)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, तानि) इस्सन्ति |

### आज्ञार्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) मि | (मयं) म |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) हि | (तुम्हे) थ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) तु | (ते, ता, तानि) अन्तु |

### विध्यर्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) एय्यामि | (मयं) एय्याम |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) एय्यासि | (तुम्हे) एय्याथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) ए, एय्य | (ते, ता, तानि) एय्युं |

### संकेतार्थ

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष (उ.पु.) | (अहं) इस्सं | (मयं) इस्सम्ह |
| द्वितीय पुरुष (म.पु.) | (त्वं) इस्स | (तुम्हे) इस्सथ |
| तृतीय पुरुष (प.पु.) | (सो, सा, तं) इस्स | (ते, ता, तानि) इस्संसु |

# ४) सन्धी

**एकापुढे एक येणारे जवळजवळचे वर्ण एकत्र जोडण्याच्या प्रकारास 'सन्धी' असे म्हणतात.**

पालिमध्ये तीन प्रकारच्या सन्धी आहेत -

१) स्वर सन्धी    २) व्यंजन सन्धी    ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

## १) स्वर सन्धी

दोन स्वर एकापुढे एक असल्यास ते एकमेकांत मिळून जातात. त्यास स्वरसन्धी म्हणतात. पालि भाषेतील स्वरसन्धी विषयाचे काही प्रमुख नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१) अ पासून ऊ पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्हणजे त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल एक दीर्घ स्वर होतो.

| प्रकार | उदाहरणे | सन्धी | प्रकार | उदाहरणे | सन्धी |
|---|---|---|---|---|---|
| अ + अ | पन + अयं | पनायं | आ + अ | पाद + अपि | पादापि |
| आ + आ | तण्हा + आकुला | तण्हाकुला | इ + इ | उपद्वहन्ति + इति | उपद्वहन्तीति |
| इ + ई | नहि + ईदिसो | नहीदिसो | | | |
| उ + ऊ | बहु + ऊसहन | बहूसहन | उ + उ | बहु + उपकारो | बहूपकारा |

२) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होताना क्वचित पहिल्या स्वराचा लोप होतो.

पुरिस + उत्तमो ( = अ+उ) = पुरिसुत्तमो

निलानि + एकानि ( = इ + ए) = निलानेकानि

तत्र+ इमे (अ +इ) = तत्रिमे

तत्थ + इमे (अ + इ) = तत्थिमे

अज्ज + उपोसथो ( = अ + उ) = अज्जुपोसथो

एसो + आवुसो (= ओ + आ) = एसावुसो

३) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होत असता क्वचित पुढच्या स्वराचा लोप होतो.

रूक्खो + अपि (=ओ + अ) = रूक्खोपि

देवो + अम्हि ( = ओ + अ) = देवोम्हि

सो + अहं (=ओ + अ) = सोहं

सो + अपि ( = ओ + अ) = सोपि

चत्तारो + इमे (= ओ + इ) = चत्तारोमे

४) स्वराच्या पुढे स्वर आल्यास दोन पदांची सन्धी होत असता कधी कधी दोहोंपैकी एकाही स्वराचा लोप होत नाही.

कञ्ञा + इव (= आ + इ) = कञ्ञाइव

लता + इव (= आ + इ) = लताइव, लतेव, लताव

५) लोप झालेल्या स्वरापुढे 'इ' असेल तर त्याऐवजी 'ए' होतो आणि 'उ' असेल तर त्याचा 'ओ' होतो.

तस्स + इदं (= अ +इ) = तस्सेद

वात + इरितं (= अ + इ) = वातेरितं;

वाम + उरू (= अ + उ) = वामोरू
वि + उदकं ( = इ + उ) = वोदक.

६) 'इ' (ऱ्हस्व - दीर्घ) अथवा 'उ' (ऱ्हस्व - दीर्घ) यांच्यापुढे इतर वर्ण आल्यास 'इ' चा 'य' आणि 'उ' चा 'व' होतो.
वि + आकतो (= इ+आ) = व्याकतो
इति + अस्स (= इ + अ) = इत्यस्स
सु + आगतं ( = उ + आ) = सुसागतं, स्वागत= सागतं
बहु + आबाधो (= उ + आ) = बव्हाबाधो

## २) व्यंजन सन्धी

**जेव्हा एक व्यंजन दुसऱ्या व्यंजनाबरोबर अथवा स्वराबरोबर मिळते तेव्हा त्याला व्यंजन सन्धी म्हणतात.**

१) जेव्हा एखादया स्वरापुढे पर- अक्षर हे जर व्यंजन असेल तर पूर्वी असलेल्या ऱ्हस्व स्वराचा दीर्घ स्वर होतो आणि दीर्घ स्वराचा ऱ्हस्व स्वर होतो.
सम्म + धम्मो ( =अ + ध + अ) = सम्माधम्मो
खन्ति + परमं ( = इ + प + अ) = खन्तीपरमं
जायति + सोको (= इ + स + ओ) = जायतीसोको
मुनि + चरे (= इ + च +अ) = मुनीचरे

२) स्वरापुढे व्यंजन आले असल्यास केव्हा केव्हा त्या व्यंजनाचे द्वित्व होते.
वि + गहो (= इ + ग + अ) = विग्गहो
प + गहो (= अ + ग +अ) = पग्गहो
दु +कतं (= उ + क + अ) = दुक्कतं

३) 'ए' आणि 'ओ' च्या नंतर कोणताही वर्ण आल्यास 'ए' आणि 'ओ' चा 'अ' होतो.
याचकं आगते (= ए + आ) = याचकमागते          सो + सीलवा (= ओ + स् + ई) = स सीलवा

## ३) निग्गहित (अनुस्वार) सन्धी

**अनुस्वारा (निग्गहिता) बरोबर स्वर अथवा व्यंजन मिळते तेव्हा त्याला निग्गहित सन्धी म्हणतात.**

१) काही वेळा निग्गहिताचा लोप होतो. उदा.

| | | |
|---|---|---|
| सं + रत्तो = सारतो | सं + रागो = सारागो | कथं + अहं = कथाहं |
| गन्तुं + कामो = गन्तुकामो | बुद्धानं + सासनं = बुद्धानसासनं | एवं + अहं = एवाहं |

२) निग्गहिता (अनुस्वारा) पुढे आलेल्या स्वराचा काही वेळा लोप होतो. उदा.

| | |
|---|---|
| त्वं + असि = त्वंसि | किं + इति = किंति |
| इदं + अपि = इदम्पि | अलं + इदानि = अलन्दानि |

३) जर निग्गहितानंतर 'य', 'एव' तसेच 'हि' हे शब्द आल्यास, निग्गहिताचा काही वेळा 'ञ' होतो. तसेच 'य' पुढे आल्यास पूर्वीच्या 'स' शब्दावरील निग्गहिताचा 'ञ' होतो. उदा.

| | | |
|---|---|---|
| तं + एव = तञ्ञेव | तं + हि = तञ्हि | एवं + आह = एवमाह |
| सं + यतो = सञ्ञतो | सं + यमो = सञ्ञमो | एवं + एव = एवमेव |

## ५) धातुरुपाविषयी माहिती (काळ)

१) क्रियावाचक शब्दाला 'धातू' म्हणतात. मूळ धातूला परस्मैपदाचे प्रत्यय लावून क्रियापद बनवता येते. एकंदरीत पालिभाषेत आत्मनेपदी क्रियापदांची रूपे कमी आहेत.

२) प्रामुख्याने पालिमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो. आत्मनेपद कर्मणि प्रयोग व कवितेत उपयोगात येते.

३) पालिभाषेत द्विवचन नसल्याने क्रियापद एकवचनी किंवा अनेकवचनी असते.

४) पालि व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पालि व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालील प्रमाणे क्रम आहेत.

| पालि | मराठी | पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष | मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष | पठम पुरिस | तृतीय पुरुष |

५) काळ व अर्थवाचक काही पालि संज्ञा पुढीलप्रमाणे

| पालि | मराठी | पालि | मराठी |
|---|---|---|---|
| १) पच्चुपन्न कालो<br>३) भविस्सन्ती/ अनागत कालो | वर्तमानकाळ<br>भविष्यकाळ | २) हीय्यत्तनी / अतीत कालो | भूतकाळ |

### पच्चुपन्न कालो (वर्तमानकाळ)

### वर्तमानकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) मि | (मयं) म |
| मज्झिम पुरिस | (त्वं) सि | (तुम्हे) थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) ति | (ते, ता, तानि) अन्ति |

### पच = शिजविणे

| पुरिस (पुरुष)/ वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | पचामि | पचाम |
| मज्झिम पुरिस | पचसि | पचथ |
| पठम पुरिस | पचति | पचन्ति |

खाद, नम, गच्छ, पठ, वस, कस इत्यादी धातू 'पच' प्रमाणे चालतात.

### अतीत कालो (भूतकाळ)

### भूतकाळी परस्मैपदी प्रत्यय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इं | (मयं) इम्ह |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इ | (तुम्हे) इत्थ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इ | (ते, ता, तानि) इंसु, उं |

## खाद (खाणे)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | खादिं | खादिम्ह |
| मज्झिम पुरिस | खादि | खादित्थ |
| पठम पुरिस | खादि | खादिंसु, खादुं |

कीळ, हस, लभ, नम, वस, गच्छ इत्यादी धातू 'खाद' प्रमाणे चालतात.

## अनागतकालो (भविष्यकाळ)

## भविष्यकाळी परस्मैपदी प्रत्येय पुढीलप्रमाणे

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | (अहं) इस्सामि | (मयं) इस्साम |
| मज्झिम पुरिस | (त्वं) इस्ससि | (तुम्हे) इस्सथ |
| पठम पुरिस | (सो, सा, तं) इस्सति | (ते, ता, तानि) इस्सन्ति |

## पठ (शिकणे/वाचणे)

| पुरिस (पुरुष) / वचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उत्तम पुरिस | पठिस्सामि | पठिस्साम |
| मज्झिम पुरिस | पठिस्ससि | पठिस्सथ |
| पठम पुरिस | पठिस्सति | पठिस्सन्ति |

लभ, गच्छ, नम, वस, कस इत्यादी धातू 'पठ' प्रमाणे चालतात.

☆☆☆

# ६) समास

**भाषेत जेव्हा दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन व्याकरण दृष्ट्या एक शब्द होतो तेव्हा त्याला समास किंवा सामासिक शब्द असे म्हणतात.** असे समास हे अभिजात भाषांचे वैशिष्ट्य होय. पालि भाषेमध्ये समासांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

१) द्वन्द (द्वन्द्व) समास
२) तप्पुरिस (तत्पुरुष) समास
३) बहुब्बीहि (बहुव्रीही) समास
४) अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास

## १. द्वन्द (द्वन्द्व) समासः

दोन अथवा जास्त शब्दातील 'च' (आणि) चा लोप करुन जो समास तयार होतो त्याला 'द्वन्द' (द्वन्द्व) समास असे म्हणतात. यामध्ये सर्व शब्द सारखेच महत्त्वाचे असतात. द्वन्द समास दोन प्रकारे आहेत –

अ) समाहार द्वन्द समास
ब) इतरेतर द्वन्द समास

**अ) समाहार :** दोन संज्ञा समासात येऊन 'च' ने जोडल्यावर अर्थ प्रगट करतात आणि एक समाहाराचा (समूहाचा) बोध करतात तेव्हा तो समाहार द्वन्द समास होतो, हा समास नपुंसकलिंगी असतो.

उदा.

मुखं च नासिका च – मुखनासिकं
गीतं च वादितं – गीतवादितं
युगं च नङ्गलं च – युगनङ्गलं
डंसो च मकसो च – डंसमकसं
दासि च दासो च – दासिदासं
कण्हो च सुक्को च – कण्हसुक्कं

**ब) इतरेतर :** जेव्हा समासातील दोन्ही पदे प्रधान असतात तेव्हा त्यास 'इतरेतर द्वन्द समास' म्हणतात. हा समास नित्य बहुवचनी असून शेवटच्या पदाचे लिंग हे त्या संपूर्ण समासाचे लिंग असते.

उदा.

चन्दिमा च सुरियो च – चन्दिमसुरिया
समणो च ब्राह्मणो च – समणब्राह्मणो
माता च पिता च – मातापितरो
पिता च पुत्तो च – पितापुत्ता

## २. तप्पुरिस (तत्पुरुष) समास :

तत्पुरुष समासाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) विभत्ति तप्पुरिस
२) कम्मधारय
३) द्विगु
४) मज्झिमपदलोपी
५) नञतप्पुरिस
६) अलुत्ततप्पुरिस
७) उपपदतप्पुरिसं

### १) विभत्तितप्पुरिस (विभक्ती तत्पुरुष) :

**दुतिया तप्पुरिस :**
उदा. गामं गतो –गामगतो
देसं गतो – देसगतो
बन्धनं गतो – बन्धगतो

**ततिया तत्पुरिस :**
उदा. बुध्देन भासितं – बुध्दभासितं
पितुना सदिसो – पितुसदिसो

**चतुत्थी तप्पुरिस :**
उदा. सङ्घाय भत्तं – सङ्घभत्तं
कुण्डलाय सुवण्णं – कुण्डलसुवण्णं
रजनाय दोणि – रजनदोणि
नहानाय जलं – नहानजलं

**पञ्चमी तप्पुरिस :**

उदा. चोरस्सा भयं – चोरभयं पापस्मा मुत्तो – पापमुत्तो

मुसावादा विरति – मुसावादविरति

**छट्ठी तप्पुरिस :**

उदा. रुक्खस्स साखा – रुक्खसाखा धञ्ञस्स रासि – धञ्ञरासि रञ्ञो पुत्तो – राजपुत्तो, रञ्ञोपुत्तो

रञ्ञो पुरिसो – राजपुरिसो मगधानं राजा – मगधराजा

**सत्तमी तप्पुरिस :**

उदा. संसारे दुक्खं – संसारदुक्खं जले कीळा – जलकीळा

आकासे गमनं – आकासगमनं अकाले मेघो – अकालमेघो

२) **कम्मधारय समास (कर्मधारय समास):** जेव्हा समासातील दोन्ही घटक एकाच विभक्तीत असतात. (समानाधिकरण) तेव्हा 'कम्मधारय समास' होतो.

उदा. महन्तो पुरिसो – महापुरिसो मुखं चन्दो विय – मुखचन्दो

पञ्ञा सुरियो विय – पञ्ञासुरियो विज्जा एव धन – विज्जाधनं

बुध्दघोसो येव आचरियो –बुद्धघोसाचरियो

३) **द्विगु :** जेव्हा कम्मधारय समासाचे पहिले पद संख्यावाचक असते तेव्हा द्विगु समास होतो.

उदा. दस सीलानि – दससीलानि एको पहारो – एकप्पहारो

४) **मज्झिमपदलोपि :** कर्मधारय समासात दोन पदांना जोडणारे पद जेव्हा गाळले जाते तेव्हा मज्झिपदलोपि समास होतो.

उदा. गन्धेन मिस्सित तेलं – गन्धतेलं पिट्ठिया उग्गतो पासाणो – पिट्ठिपासाणो

५) **नञतप्पुरिस :** जेव्हा नकारवाचक किंवा निषेधवाचक अव्ययाचा नामाशी समास होतो तेव्हा त्याला नञतप्पुरिस समास म्हणतात.

उदा. न मनुस्सो – अमनुस्सो

न कालो – अकालो

न पण्डितो – अपण्डितो

न वसलो – अवसलो

न ब्राह्मणो – अब्राह्मणो

धम्मस्स विरुद्धो – अधम्मो

संसयस्स अभावो – असंसयो

६) **अलुत्त तप्पुरिस :** या प्रकारात पहिल्या पदाचा विभक्ती प्रत्यय-तसाच राहतो, त्याचा लोप होत नाही.

उदा. परस्स पदं – परस्सपदं अन्ते वसति – अन्तेवासी, उदके चरन्ति – उदकेचरा

७) **उपपद तत्पुरिस :** जेव्हा समासाचे दुसरे पद धातुसाधित असते आणि ते स्वतंत्रपणे वापरता येत नाही तसेच समासाचा विग्रह केला असता त्या धातुसाधित पदाचे क्रियापदात रुपांतर होते. तेव्हा उपपद तप्पुरिस समास होतो.

उदा.फले जायति इति – फलजं कुम्भं करोति इति – कुम्भकारो

धनं ददाति इति – धनदो धम्मं जानाति इति – धम्मञ्ञू

### ३. बहुब्बीहि (बहुव्रीही) समासः

ज्यावेळी दोन किंवा अधिक पदांचा समास तयार होतो संपूर्ण समास दुसऱ्याच एखाद्या नामाचे किंवा अर्थाचे विशेषण होतो व त्याविषयी माहिती सांगतो त्यावेळी 'बहुब्बीही (बहुव्रीही) समास' म्हणतात.

उदा. बहूनि धनानि यस्स सो बहुधनो. जितानि इन्दियानि यस्स सो जितिन्द्रियो.

लम्बा कण्णा यस्स सो लम्बकण्णो. समानं उदरं यस्स सो सोदरियो.

मना सेट्ठा एतेसं इति मनोसेट्ठा. उदक पीयते अस्मिं इति उदपान.

### ४. अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास :

जेव्हा समासाचे पहिले पद अव्यय आणि दुसरे नाम असते तेव्हा संपूर्ण समास अव्यय होतो. म्हणून त्याला 'अव्वयीभाव (अव्ययीभाव) समास' म्हणतात.

उदा. दिन दिने - पटिदिनं

वस्स वस्से - अनुवस्सं

नगरा बहि - बहिनगरे

कम्मं अनतिकम्मं-यथाकम्मं

गङ्गाय समीप - उपगङ्गं

## ७) अव्यय

### १. हेत्वर्थक अव्यय :

'हे करण्याकरिता' या अर्थी हेत्वर्थक अव्यय उपयोगात आणले जाते.

धातूला 'तुं' 'ताये' आणि 'तवे' हे प्रत्यय लावून हेत्वर्थक अव्यय तयार होतात.

उदा. सो भोतुं गच्छति । (तो जेवण्याकरिता जातो.)

कातुं गच्छति। (करण्याकरिता जातो.)

कातवे गच्छति । (करण्याकरिता जातो.)

### २. पूर्वकालवाचक अव्यय :

'हे काम करून' या अर्थी पूर्वकालवाचक अव्यय उपयोगात आणले जाते. धातूला 'त्वा', 'त्वान', 'तून' हे प्रत्यय लावून पूर्वकालवाचक अव्यय तयार होतात.

उदा. सो विहारं गन्त्वा बुद्धं वन्दति।

(तो विहारात जावून बुद्धाला वंदन करतो.)

सो सुत्वा याति ।

सो सुत्वान याति ।


सो सोतून याति ।

(तो ऐकून येतो)

☆☆☆

# परिसिट्ठं द्वे– सुलभो पालि (सुलभ पालि)

## १) सरीरस्स अवयवानि




## २) ञातिगणा

| | |
|---|---|
| माता = आई | धीता = मुलगी |
| पिता = वडिल | सस्सु = सासू |
| भाता = भाऊ | सालको = मेहुणा |
| भगिनी = बहिण | दवरो = दीर |
| मातुलो = मामा | ननन्दरा = नणंद |
| मातुच्छा = मावशी | भागिनेय्यो = भाचा |
| पितुच्छ = आत्या | नत्तरो = नातू |
| अय्यको = आजी | भत्तु = पती |
| चुळपिता = चुलता/काका | दारा = पत्नी |
| चुळमाता = चुलती/काकू | पुत्तो = मुलगा |
| तनय = मुलगा<br>तनया = मुलगी | ससुरो = सासरा |

## ३) **वण्णानि** (रंगानि)

सेतं
(पांढरा)

नीलं
(निळा)

पीतं
(पिवळा)

लोहितं
(लाल)

पिङ्गलं
(तपकिरी)

हरित
(हिरवा)

कासायं
(तांबडा)

कण्हं
(काळा)

पाटलं
(गुलाबी)

## ४) रसानि

| मधुरं | कटुकं | अम्बिलं | तिखिणं |
|---|---|---|---|
| अम्बं = आंबा | कारवेल्लं = कारले | तक्कं = ताक | मरिचं = मिरची |
| उच्छुं = ऊस | ओसधं = औषध | दधिं = दही | पलण्डुक = कांदा |
| पायासं = खीर | काखल्लो = कडू भोपळा | चिचा = चिंच | पिप्पलं = काळीमिरी |

## ५) गेहसेवक पसु



उसभो(बैल)



धेनु(गाय)



महिसा(म्हैस)



ससो/पेलको(ससा)



अजो(बकरा)



एळको (एडका)



सुनखो/कुक्कुरो(कुत्रा)



अस्सो(घोडा)



बिळारो/मज्जारो(मांजर)



मेण्डको (मेंढा)



गदभो(गाढव)

## ६) तिरच्छाना



सीहो(सिंह)



व्यग्घो(वाघ)



अच्छो(अस्वल)



सिगालो(लांडगा)



कुञ्जरो(हत्ती)



कपि(माकड)



मिगो (हरीण)



करभो(उंट)



खग्गविसाणो(गेंडा)



तरच्छो(तरस)



वको(कोल्हा)



सुकरो(डुक्कर)

## ७) जलथलगोचरा



उरगो(साप)



मण्डूको(बेडूक)



ककण्टको(सरडा)



गोधा(घोरपड)



उद्गो(पाणमांजर)



सरभू(पाल)



मच्छो(मासा)



कक्कटको(खेकडा)



कुम्भीलो(मगर)




कच्छपो(कासव)

# ८) किमी



किपिल्लिका(मुंगी)



पटङ्गो (नाकतोडा)



भमरो(भुंगा)



मकसो(मच्छर)



मक्कटकको(कोळी)



मधुपा(मधमाशी)




मकुणो(ढेकूण)



झल्लिका(रातकिडा)

# ९) सकुणा




मयुरो(मोर)



कुणालो(कोकिळ)



कुक्कटो(कोंबडा)




कुक्कुटी(कोंबडी)



उलूको(घुबड)



कोञ्चो(बगळा)



कोट्ठो(सुतारपक्षी)



यालिया(मैना)



गिज्झो(गिधाड)



काको(कावळा)



चटको(चिमणा)



कपोतो(कबूतर)

# १०) फलफलानि च पुष्पानि च



कदली(केळे)



उच्छु(ऊस)




अम्बं(आंबा)



जम्बु(जांभूळ)



बदरं(बोर)



कक्कारिका(काकडी)



पद्मं(कमळ)



कक्कारु(दुधी भोपळा)



लबुजं(फणस)



मल्लिका(चमेली)



कुमुदं(पांढरेकमळ)

## ११) यानानि



रथं(रथ)



आकासयानं(विमान)



नाव(होडी)



सकटं(बैलगाडी)

## १२) आयुधं (हत्यारे)



ककचं(करवत)



असि(तलवार)



वासि(कुऱ्हाड)



कुद्दरलं (कुदळ)



विकन्तह(चाकू)



सूलं(भाला)



छुरिका(सुरी)



खूरं(पाते)



कुटं(हातोडी)

## १३) **संख्या** (अंक)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एकं | २९ | एकूनतिंसति |
| २ | द्वे | ३० | तिंसति |
| ३ | तयो/ति/तय | ३१ | एकतिंसति |
| ४ | चतु(चतारो) | ३२ | द्वात्तिसति |
| ५ | पञ्च | ३३ | तेत्तिंसति |
| ६ | छ | ३४ | चतुत्तिंसति |
| ७ | सत्त | ३५ | पञ्चतिंसति |
| ८ | अट्ठ | ३६ | छत्तिंसति |
| ९ | नव | ३७ | सत्ततिंसति |
| १० | दस | ३८ | अट्ठतिंसति |
| ११ | एकादस | ३९ | एकूनचत्ताचाळीसति |
| १२ | द्वादस,(बारस) | ४० | चत्ताळीसति |
| १३ | तेळस(तेरस) | ४१ | एकचत्ताळीसति |
| १४ | चुद्दस, चतुद्दस | ४२ | द्विचताळीसति |
| १५ | पण्णरस, पञ्चदस | ४३ | तेचत्ताळीसति |
| १६ | सोळस | ४४ | चतुचत्ताळीसति |
| १७ | सत्तरस, सत्तदस | ४५ | पञ्चचत्ताळीसति |
| १८ | अट्ठादस, अट्ठादस | ४६ | छत्ताळीसति |
| १९ | एकूणवीसति | ४७ | सत्तचत्ताळीसति |
| २० | वीसति | ४८ | अट्ठचत्तालिसति |
| २१ | एकवीसति | ४९ | एकूनपञ्ञासति |
| २२ | द्वावीसती, बावीसति | ५० | पण्णासा,पञ्चासति |
| २३ | तेवीसति | ५१ | एकपञ्ञासति,एकपण्णासा |
| २४ | चतुवीसति | ५२ | द्वेपञ्ञासति, द्वेपण्णासा |
| २५ | पञ्चवीसति | ५३ | तिपञ्ञासति, तिपण्णासा |
| २६ | छब्बीसति | ५४ | चतुञ्ञासति,चतुपण्णासा |
| २७ | सत्तावीसति | ५५ | पञ्चपञ्ञासति, पञ्चपण्णासा |
| २८ | अट्ठावीसति | ५६ | छपञ्ञासति,छपण्णासा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | सत्तपञ्ञासति, सत्तापण्णासा | ८० | असीति |
| ५८ | अट्ठपञ्ञासति, अट्ठपण्णासा | ८१ | एकासिति |
| ५९ | नवु पञ्ञासति, एकुणसट्ठि | ८२ | द्वेअसीति, द्विआसीति |
| ६० | सट्ठि | ८३ | तेसअसति, तिअसीति |
| ६१ | एकसट्ठि | ८४ | चतुरासीति |
| ६२ | द्वासट्ठि, द्विसट्ठि | ८५ | पञ्चअसीति |
| ६३ | तेसट्ठि, तिसट्ठि | ८६ | सट्ठअसीति |
| ६४ | चतुसट्ठि | ८७ | सत्त असीति |
| ६५ | पञ्चसट्ठि | ८८ | अट्ठअसीति |
| ६६ | छसट्ठि | ८९ | एकुननवुति |
| ६७ | सतसट्ठि | ९० | नवुति |
| ६८ | अठसट्ठि | ९१ | एक नवुति |
| ६९ | एकूनसत्तति | ९२ | द्वानवुति, द्विनवुत्ति |
| ७० | सत्तति | ९३ | तेनुवुति, तिनवुति |
| ७१ | एकसत्तति | ९४ | चतुनवुति |
| ७२ | द्वासत्तति,द्विसत्तति | ९५ | पञ्चनवुति |
| ७३ | तेसत्तति, तिसत्तति | ९६ | छनवुति |
| ७४ | चतुसत्तति | ९७ | सत्तनवुति |
| ७५ | पञ्चसत्तति | ९८ | अट्ठनवुति |
| ७६ | छसत्तति | ९९ | एकूनसतं |
| ७७ | सत्तसत्तति | १०० | सतं |
| ७८ | अट्ठसत्तति | १००० | सहस्सं |
| ७९ | एकूनासीति | १०,००० | नहुतं |

| | |
|---|---|
| १,००,००० | सत सहस्सं |
| १,००,००,००० | कोटी |
| १,००००००००००००० | पकोटी |
| १,००००००००००००००००००००० | कोटी पकोटी |

☆☆☆

# परिसिट्ठं तयो– संवाद कौशल्य, निबन्धो (निबंध)

## संवाद कौशल्य

१) पोत्थकं किं भासाय लिखितं?
पुस्तक कोणत्या भाषेत लिहिले आहे. ?

२) पोत्थकं पालि भासाय लिखिता।
पुस्तक पालि भाषेत लिहीले आहे.

३) पालिभासा मधुरं अत्थि।
पालि भाषा मधुर आहे.

४) तथागतो बुद्धेन पालिभासाय धम्मदेसना ददि।
तथागत बुद्धाने पालिभाषेत धम्मोपदेश केला.

५) पालिभासा धम्मगन्थस्स भासा अत्थि।
पालिभाषा धम्मग्रंथाची भाषा आहे.

६) डॉ. बाबासाहेब आम्बेडकरो पालिसद्दकोसं लिखितं।
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पालि शद्बकोश लिहिला आहे.

७) त्वं पालिभासा जानासि?
तू पालिभाषा जाणतोस?

८) अहं पालिभासा जानामि।
मी पालि भाषा जाणतो.

९) तव हत्थस्मिं पोत्थकं किदिसा भासा लिखिता अत्थि।?
तुझ्या हातातील पुस्तक कोणत्या भाषेत लिहीले आहे?

१०) मम हत्थेसु पोत्थकं पालिभासाय लिखितं अत्थि।
माझ्या हातातील पुस्तक पालि भाषेत लिहीले आहे.

११) अहं पालिभासाय अज्झापकं अत्थि।
मी पालिभाषेचा अध्यापक आहे.

१२) मा धितरं भूहणवधं करोथ।
मुलीची भ्रूणहत्या करू नका.

१३) सचे सब्बे माताय पुत्तं इच्छन्ति ते सुण्हा कुहिं लभन्ति।?
जर सर्वच माता मुलांचीच इच्छा करीत असतील तर त्यांना सुना कुठून मिळतील?

१४) त्वं कुहिं वससि?
तू कुठे राहतोस?

१५) अहं लुम्बिनी नगरे वसामि।
मी लुंबिनी नगरात राहतो.

१६) इदं मम गेहं।
हे माझे घर आहे.

१७) मम गेहं एकं उय्यानं समीपं अत्थि।
माझे घर एका उद्यानाजवळ आहे.

१८) विज्जालयं पस्सित्वा ममं अतिव आनन्दो होति।
विद्यालय पाहून मला खूप आनंद होतो.

१९) अहं मातरं च पितरं च वन्दामि।
मी आई आणि वडिलांना वंदन करतो.

२०) अहं आचरियं वन्दामि।
मी आचार्याला वंदन करतो.

२१) मातापितुं उपट्ठानं करेय्य।
आईवडीलांची सेवा करावी.

२२) केचि मनुस्सा न जच्चावं सेट्ठो।
कोणताही माणूस जातीने श्रेष्ठ होत नाही.

२३) सब्बे समसमाना सन्ति।
सर्व समसमान आहेत.

२४) इत्थि च पुरिसो च समाना सन्ति ।
स्त्री पुरुष समान आहेत.

२५) मा मुसा भणथ।
खोटे बोलू नका.

२६) मा मज्ज पिवथ।
मद्य पिऊ नका.

२७) मा पापमित्ते भजथ।
वाईट मित्रांची संगती करू नका.

२८) मा गण्ह अदिन्नं दानं।
न दिलेले घेऊ नको.

२९) द्वेत्थेसु दस अङ्गुलियो।
दोन हाताला दहा बोटे आहेत.

३०) अयं पञ्चसीले धजो।
हा पंचशील ध्वज आहे.

३१) पस्स अयं धजो।

हा ध्वज पहा.

३२) अयं अम्हाक रट्ठधजो।

हा आमचा राष्ट्रध्वज आहे.

३३) रट्ठधजस्स मज्झेभागे असोकचक्कं अत्थि।

राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी अशोकचक्र आहे.

३४) असोकथम्भे चतारो सीहा भारतस्स राजमुद्दा अत्थि।

अशोकस्तंभावर कोरलेले चार सिंह भारताची राजमुद्रा आहे.

३५) सुप्पभातं।

सुप्रभात.

३६) सागतं! भवतो निसिदाह इमस्मिं आसने ।

स्वागत! कृपा करून येथे या आसनावर बसा.

३७) को तुय्हं पिता नामं?

तुझ्या वडिलांचे नाव काय?

३८) मम पिता नाम भिमरावो अत्थि।

माझ्या वडीलांचे नाव भीमराव आहे.

३९) को अत्थि त्वं?

तू कोण आहे?

४०) अहं एको माणवको अत्थि।

मी एक विद्यार्थी आहे.

४१) कुहित्वा त्वं आगच्छसि?

तू कोठून आला आहेस?

४२) अहं नागपुरनगरे आगच्छामि।

मी नागपूर नगरातून आलो आहे.

४३) तुय्हं मातापितरो कुहिं वसति?

तुझे आईवडील कुठे राहतात?

४४) तव भातरो किं करन्ति?

तुझे भाऊ काय करतात?

४५) तुय्हं आयुं कित्तं अत्थि?

तुझे वय किती आहे?

४६) इदं मे अक्खी ।

हे माझे डोळे आहेत.

४७) इदं अक्खिनं अहं पस्सामि।
या डोळ्यांनी मी पाहतो/पाहते.

४८) इदं मे कण्णेन अहं सद्दं सुणामि।
माझ्या कानांनी मी शब्द ऐकतो.

४९) इदं मे मुखं अत्थि।
हे माझे तोंड आहे.

५०) मयस्स मुखेन अहं खादामि।
माझ्या तोंडाने मी खातो.

५१) इदं मम हत्थं अत्थि।
हे माझे हात आहेत.

५२) मम हत्थेन अहं कम्मं करोमि।
माझ्या हाताने मी काम करतो.

५३) अहं विज्जालयं गच्छामि।
मी विद्यालयात जात आहे.

५४) अहं विज्जालयं गच्छि।
मी विद्यालयात गेलो होतो.

५५) अहं विज्जालयं गच्छिस्सामि।
मी विद्यालयात जाईल.

५६) अहं पोत्थकं पठामि।
मी पुस्तक वाचत आहे.

५७) अहं पोत्थकं पठि।
मी पुस्तक वाचले.

५८) अहं पोत्थकं पठिस्सामि।
मी पुस्तक वाचेल.

५९) अहं भोजनं भुञ्जामि।
मी जेवन करीत आहे.

६०) अहं भोजनं भुञ्जि।
मी जेवन केले.

## **निबन्धो** (निबंध)

- **खालील दिलेल्या विषयांवर निबंध लिहा.**

१) पाठसाला २) धेनु ३) उय्यानं ४) कस्सको
५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरो ६) आचरियो ७) मयं गामं ८) मम परीवारो

# परिसिट्ठं चतु– अपठितो (अपठित उतारे)

## गज्जो विभागो

### १) सुंसुमार जातकं

अतीते वाराणसियं ब्रह्मदत्ते रज्जं कारेन्ते हिमवन्तपदेसे बोधिसत्तो कपियोनियं निब्बत्तित्वा नागबलो थामसम्पन्नो महासरीरो सोभग्गपत्तो हुत्वा गङ्गानिवत्तने अरञ्ञायतने वासं कप्पेसि। तदा गङ्गाय एको सुंसुमारो वसि। अथस्स भरिया बोधिसत्तस्स सरीरं दिस्वा तस्स हदयमंसे दोहळं उप्पादेत्वा सुंसुमारं आह, 'अहं सामि, एतस्स कपिराजस्स हदयमंसं खादितुकामा' ति 'भद्दे मयं जलगोचरो, एस थलगोचरा किन्तु' न्ति गण्हितुं सक्खिस्सामा' ति। 'येन केन उपायेन गण्ह, सचे न लभिस्सामि मरिस्सामी' ति। 'तेन हि मा भायि, अत्थेको उपायो' ति खादापेस्सामि तं तस्स हदयमंसं' न्ति सुंसुमारी समस्सासि। अथेकदिवसं बोधिसत्तस्स गंङ्गाय पानीय पिवित्वा गङ्गातीरे निसिन्नकाले सन्तिकं गन्त्वा एवमाह– 'वानरिन्द, इमस्मिं पदेसे कसटफलानि खादन्तो किं त्वं चिण्णट्ठाने येव चरसि, पारगङ्गाय अम्ब–लबुजादीनं मधुरफलानं अन्तो नत्थि,किं ते तत्थ गन्त्वा फलाफलं खादितुं न वट्टती' ति।

## स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**


१) पूर्वी वाराणसीमध्ये कोण राज्य करीत असे?
२) बोधिसत्व कोणत्या कुळात जन्मला होता?
३) बोधिसत्व शरीराने कसा होता?
४) बोधिसत्व कुठे राहत होता?
५) गंगेमध्ये कोण राहत असे?
६) मगराच्या पत्नीला काय खाण्याची इच्छा निर्माण झाली?
७) प्रस्तुत उताऱ्यात कोणत्या मधुर फळांचा उल्लेख आला आहे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अतीते वाराणसियं बोधसत्तो रज्जं कारेन्ते।
२) तदा गङ्गाय एको सुंसुमारो वसि।
३) अहं सामि, एतस्स कपिराजस्स हदयमंसं खादितुकामा' ति।
४) किन्ति तं गण्हितुं सक्खिस्सामा' ति।
५) येन केन उपायेन गण्ह, सचे न लभिस्सामि मरिस्सामी' ति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**

१)



२)



**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) वाराणसियं ब्रह्मदत्ते | अ) कपियोनियं निब्बति। |
| २) हिमवन्तपदेसे बोधिसत्तो | ब) रज्जं कारेन्ते। |
| | क) वासं कप्पेसि। |

# २) सठस्स पटिसाठेय्यं

अतीते वाराणसियं बह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो अमच्चकुले निब्बत्तित्वा वयप्पत्तो विनिच्छयामच्चो अहोसि। तदा गामवासी च नगरवासी चाति द्वे वाणिजा मित्ता अहेसुं। गामवासी नगरवासिस्स सन्तिके पञ्च फालसतानि ठपेसि। सो ते फाले विक्किणित्वा मूलं गहेत्वा फालानं ठपितट्ठाने सिकवच्चं आकिरित्वा ठपेसि। अपरभागे गामवासी आगन्ता ''फालं मे देहि'' ति आह। कुटवाणिजो ''फाला ते मूसिकाहि खादिता'' ति मूसिकवच्चं दस्सेसि। इतरो 'खादिता व होन्तु, मूसिकेहि खादिते किं सक्का कातुं' ति। गामवासी नहानत्थाय तस्स पुत्तं आदाय गच्छन्तो एकस्स सहाय्यकस्स गेहे ''इमस्स दारकस्स कत्थचि गन्तुं मा देथा'' ति वत्वा अन्तोगब्भे निसीदापेत्वा सयं नहायित्वा कुटवाणिजस्स गेहं आगमासि। सो 'पुत्तो मे कहं' ति आह ''सम्मं, तव पुत्तं तीरे ठपेत्वा मम उदके निमुज्जकाले एको कुलको आगन्त्वा तव पुत्तं नखपञ्जरेन गहेत्वा आकासे पक्खन्तो, अहं पाणिं पहरित्वा विरवित्वा वायमन्तो'पि मोचेतुं नासक्खि'ति।''

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोधिसत्व कोणत्या कुळात जन्मला होता?

२) ग्रामवासीने नगरवासी जवळ काय ठेवले होते?

३) नगरवासीने लोखंडी फाळांचे काय केले?

४) ग्रामवासीने कोणता विचार केला?

५) ग्रामवासींनी स्नानासाठी जाताना कोणाला सोबत नेले?

६) नगरवासीने ग्रामवासीला काय विचारले?

७) ग्रामवासीने नगरवासीला त्याच्या मुलाबद्दल काय सांगितले?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) नगरवासिस्स सन्तिके सत्त फालसतानि ठपेसि।

२) फालं मे देही'ति आह।


३) 'इमस्स दारकस्स कत्थचि गन्तुं मा देथा'ति।

४) सा 'पुत्तो मे किं ति आह।'


५) तव पुत्तं नखपञ्जरेन गहेत्वा आकासे पक्खन्तो।

### ३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.

१)




२)




### ४. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तदा गामवासी च नगरवासी च | अ) खादिता'ति। |
| २) फालं ते मूसिकाहि | ब) किं सक्का कातुं ति? |
| | क) द्वे वाणिजामित्ता अहेसुं। |

# ३) कम्मेनेव सिद्धि न नामेन

अतीते तक्कसिलायं बोधिसत्तो दिसापामोक्खो आचरियो हुत्वा पञ्चमाणवकसतानि मन्ते वाचेसि। तस्से माणवको पापको नाम नामेन। सो एहि पापक। याहि पापकाति वुच्चमानो चिन्तेसि–'मय्हं नामं अवमङ्गलं', अञ्ञं नामं मे आहरापेस्सामी'ति। सो आचरियं उपसङ्कमित्वा 'आचरिय! मय्हं नामं अवमङ्गलं अञ्ञं मे नामं करोथा' ति आह।

अथ तं आचरियो अवोच–'गच्छ तात!' जनपद–चारिकं चरित्वा अत्तनो अभिरुचितं एकं मङ्गलं नाम गहेत्वा एहि, आगतस्स ते नामं परिवतेत्वा अञ्ञ नाम करिस्सामी' ति। सो 'साधु' ति पाथेय्यं गहेत्वा निक्खन्तो गामेनं गामं चरन्तो एकं नगर पापुणि। तत्थ एको पुरिसो कालङ्कतो जीवको नामेन। सो तं ञातिजनेन आलाहनं नीयमानं दिस्वा–'किं नामको नामेस्स पुरिसो'ति? पुच्छि जीवको नामेसो'ति। जीवको'पि मरती'ति। जीवको'पि मरति, अजीवको'पि मरति। नामनामं पण्णतिमत्तं। त्वं बालो मञ्ञेति।

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बोधिसत्व कोठे वास्तव्य करीत होते?

२) आचार्य किती विद्यार्थ्यांना शिकवित होते?

३) त्यामध्ये कोणत्या नावाचा विद्यार्थी होता?

४) 'पापक इकडे ये' असे कोण बोलवत होते?

५) आचार्याकडे येवून पापक काय म्हणाला?

६) आचार्याने पापकला काय सांगितले?

७) पापकने कोणाच्या मृत्यूची बातमी ऐकली होती?

८) जीवकाच्या मरणानंतर पापकला काय वाटले?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) तस्से माणवो पापको नाम नामेन।

२) मय्हं नामं अवमङ्गलं अञ्ञमे नाम करोथा ति।


३) तत्थं एको पुरिसो कालङ्कतो पापको नाम नामेन।

४) किं नामको नामेस्स पुरिसोति पुच्छि।

५) जीवकोपि मरति, अजीवको'पि मरति।

६) त्वं पण्डितो मञ्ञेति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| १) मय्हं नाम अवमङ्गलं | अ) त्वं बालो मञ्ञेति। |
| २) जीवकोपि मरति | ब) अञ्ञं मे नाम करोथा'ति। |
| | क) अजीवकोपि मरति। |

## ४) चीनदेसिय पवासि–युवानच्वांग

अतीते किर भारतस्स विज्जावन्ता पञ्ञावन्ता सब्बत्थ विस्सुता। तेन विविधेही देसेहि जना ञाणं लध्दं सिप्पं च विज्जा च सिक्खितुं एत्थ आगता।चीन देसस्स पि बहवो जना भारतदेसं आगता तेसु एको युवानच्वांग नामको। यदा जम्बुदिपे राजा हस्सवड्ढनो रज्जं कारेन्तो तदा कतिपयानि वस्सानि भारतदेसे वसित्वा सो चीनदेसं पटिनिवतो। हिमवतो उत्तरेन चीनदेसो वत्तति। ततो भारतदेसं आगत्वा यो अध्दा सो अतिविय कठिनो भयपरिपुण्णो च तस्मिं अध्दानि, उच्चा पब्बता च भयङ्करा गुहायो च विसाल नदिया'च घोरानि अरञ्ञानि च होन्ति।

भारतदेसे पाचिनकाले बहवो राजमग्गा होन्ति। तेहि अध्दानेहि तक्कसिला, वेसाली, राजगहं, पाटलिपुत्तं. सावत्थि, उज्जेनी, वाराणसी, पतिट्ठानं'ति विस्सुतानि नगरानि अञ्ञमञ्ञं सम्बन्धानि। तेसु अध्दानेसु दानरता राजानो विहारे च आरामे च पोक्खरनियो च भोजनसालायो च पथिगेहानि च निम्मिनित्वा पजानं कल्याणाय कम्मं अकरी' ति करोन्ति ति युवानच्वांग पण्डितो लिखति।

### स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) युवानच्वांग कोणत्या देशातील प्रवासी होता?

२) तो भारतामध्ये का आला होता?

३) भारताचे प्राचीन नाव काय होते?

४) युवानच्वांग भारतात आल्यावर भारतात कोणता राजा राज्य करीत होता?

५) हिमालयाच्या उत्तरेला कोणता देश आहे?

६) युवानच्वांच्या प्रवासातील समस्या सांगा?

७) भारतात प्राचीनकाळी पुष्कळ काय होते?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अतीते किर भारतस्स विज्जावन्ता पञ्ञावन्ता सब्बत्थ न विस्सुता।

२) यदा जम्बुदिपे राजा हस्सड्ढवनो रज्जं कारेति।


३) चीन रट्ठतोपि बहवो जना भारतदेसं न आगता।

४) विस्सुतानि नगरानि अञ्ञमञ्ञं सम्बधानि।

५) युवानच्वांग पण्डितो लिखति।

६) भारतदेसे पाचिनकाले बहवो राजमग्गा होन्ति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| १) चीन | अ) हस्सवड्ढनो |
| २) जम्बुदिप | ब) युवानच्वांग |
| | क) विविधेहि |

# ५) सीहो च सकुणो च

अतीते वाराणसियं बम्हदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो हिमवन्तपदेसे रूक्खकोट्टकसकुणो हुत्वा निब्बति। अथेकस्स सीहस्स मंसं खादन्तस्स अट्ठिं गले लग्गि। गलो उध्दुमायि, गोचरं गण्हितुं न सक्कोति, खरा वेदना पवत्तन्ति। अथ नं सो सकुणो गोचरप्पसुतो दिस्वा साखाय निलीनो, किं ते सम्म दुक्खं' ति पुच्छि।

सो तं अत्थं आचिक्खि। अहं ते सम्म, एतं अट्ठि अपनेय्यं, भयेन पन ते मुखं पविसितुं न विसहामि, खादेय्यासि पिमं' ति। मा भायि सम्म, नाहं तं खादामि जीवितं मे दे ही ति आह। तो साधू' ति तं वामपस्सेन निप्पज्जापेत्वा, यथा मुखं पिदहितुं न सक्कोति तथा तस्स अधरोट्ठे च उतरोट्ठे च दण्डकं ठपेत्वा मुखं पविसित्वा, अट्ठिकोट्टिं तुण्डेन पहरि। अट्ठि मुखे निपति। सो अट्ठिं पातेत्वा सीहस्स मुखतो निक्खमन्तो दण्डकं तुण्डेन पहरित्वा पातेन्तो व निक्खमित्वा साखग्गे निलीयि।

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बोधिसत्व कोठे राहत होता?

२) सिंहाच्या गळ्यात काय अडकले?

३) सिंहाच्या गळ्यात हाड अडकल्याने काय होत होते?

४) सुतारपक्ष्याने सिंहाला काय विचारले?

५) सुतारपक्ष्याने सिंहाला काय म्हटले?

६) सुतारपक्ष्याने सिंहाच्या गळ्यातील हाड काढण्याकरिता काय केले?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अथेकस्स सीहस्स मंसं खादन्तस्स अट्ठिं गले लग्गि।


२) गलो उध्दमायि, गोचरं गण्हितुं सक्कोति, खरा वेदना पवत्तन्ति।

३) सो तं अत्थं आचिक्खि।

४) मा भायि सम्म, नाहं तं खादामि, जीवितं मे देहि ति।

५) यथा मुखं पिदहितु सक्कोति तथा तस्स अधरोट्ठे च दण्डकं ठपेत्वा मुखं पविसित्वा, अट्ठिकोटिं तुण्डेन पहरि।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) अतीते वाराणसियं | अ) खरावेदना पवत्तति। |
| २) भयेन पन ते मुखं | ब) बह्मदत्ते रज्जं कारेन्ते। |
| | क) पविसितुं न विसहामि। |

# १) सम्मापणिहितं चित्तं

न तं माता पिता कयिरा, अञ्जे वा पि ञातका।
सम्मापणिहितं चित्तं, सेय्यसो नं ततो करे।।

दिसो दिसं यं कयिरा, वेरी वा पन वेरीनं।
मिच्छापणिहितं चित्तं, पापियो नं ततो करे।।

यथापि भमरो पुप्फं, वण्णगन्धं अहेठयं।
पलेति रसमादाय, एवं गामे मुनीचरे।।

न परेसं विलोमानि, न परेसं कताकतं।
अत्तनो व अवेक्खेय, कतानि अकतानि च।।

---

## स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) माणसाचे चांगल्या प्रकारे कोण मंगल करतो?
२) माणसाचे जास्त नुकसान कोण करते?
३) मुनीने गावात कसे वागावे?
४) भ्रमर फुलातील रस कसे ग्रहण करतो?
५) दुसऱ्याचे दोष न पाहता आपण काय करावे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) पलेति रसमादाय एवं गामे मुनीचरे।
२) अत्तनो व अवेक्खेय कताकतं।
३) सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो नं ततो करे।
४) सम्मापणिहितं चित्तं पापियो नं ततो करे।
५) न परेसं विलोमानि न परेसं कताकतं।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| १) सम्मापणिहितं चित्तं | अ) पापियो नं ततो करे। |
| २) पलेति रसमादाय | ब) एवं गामे मुनीचरे। |
| | क) सेय्यसो नं ततो करे। |

# २) पुण्णिका थेरी

‘‘उदहारि अहं सीते, सदा उदकमोतरिं।
अय्यानं दण्डभयभीता, वाचादोसभयट्ठिता।।

कस्स बाम्हण त्वं भीतो सदा उदकमोतरि।
वेधमानेहि गत्तेहि,सीतं वेदयसे भुसं’।।

‘जानन्ती च तुवं भोति, पुण्णिके परिपुच्छसि।
करोन्तं कुसलं कम्मं, रून्धन्तं कम्मं पापकं।।

‘को’ नु ते इदमक्खासि, अजानन्तस्स अजानतो।
उदकाभिसेचना नाम, पापकम्मा पमुच्चति।।

सग्गं नून गमिस्सन्ति, सब्बे मण्डूककच्छपा।
नागा च सुंसुमारा च, ये चञ्ञे उदकेचरा।।

ओरब्भिका सूकरिका,मच्छिका मिगबन्धका।
चोरा च वज्झघाता च, ये चञ्ञे पापकम्मिनो।
उदकाभिसेचना ते पि, पापकम्मा पमुच्चरे।।

## स्वाध्याय

### १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) पुण्णिका कोणते काम करीत होती?

२) कोणाच्या भीतीने ती थंडीतही काम करीत असे?

३) पुण्णिकेने बाम्हणास कोणता प्रश्न विचारला?

४) पापकर्मी कोणास म्हटले आहे?

५) कोणते कर्म करावयास पुण्णिकेने बाम्हणास सांगितले?

६) पापकर्म कशाने नष्ट होतात?

७) या पद्यामध्ये कोणाकोणामध्ये संवाद झाला आहे?

### २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) अय्यानं दण्डभयभीता,वाचादोसभयट्ठिता।


२) करोन्त अकुसलं कम्मं, रून्धन्तं कम्मं पापकं।

३) को नु ते इदमक्खासि, अजानन्तस्स अजानतो।

४) वेधमोहि गत्तेहि, उण्हं वेदयसे भुसं।

५) कस्स बाह्मण त्वं भीतो सदा उदकमोतरि।

### ३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.




### ४. योग्य जोड्या लावा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| १) उदहारि | अ) गमिस्सन्ति। |
| २) सग्गं नून | ब) पापकम्मिनो। |
| | क) अहं सीते। |

# ३) चंपा नगरी

एसा चम्पा नाम नगरी अत्थि।
तत्थ एको आचरियो वसति।।

तस्स सन्तिकं बहवो माणवका अज्झयनं करोन्ति।
सुनितो नामं बुध्दिमन्तो माणवको अत्थि।।

सो विविधेसुं विसयेसु पारंगतो होति।
सुनितो राजगहे पितु सन्तिकं गच्छति।।

तत्थ तस्स विसाखा नाम भगिनी अत्थि।
सुनितो च विसाखा च सायं समये विहारं गच्छन्ति।।

तत्थ तानि बुध्दं वन्दन्ति, थुति च गायन्ति।
सुनितो च विसाखा च, बुध्दं धम्मं च सङ्घं च सरणं गच्छन्ति।।

---

## स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आचार्य कोणत्या नगरीत राहत होते?
२) आचार्याजवळ विद्यार्थी कशाकरीता येत असत?
३) सुनित नावाचा विद्यार्थी कसा होता?
४) सुनित एकदा कुठे गेला होता?
५) सुनित कोणाच्या जवळ गेला होता?
६) सुनितच्या बहिणीचे नाव काय आहे?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) एसा चम्पा नाम नगरी नत्थि।
२) विसाखा नामं बुध्दिमन्तो माणवको अत्थि।
३) सुनितो राजगहे पितु सन्तिकं गच्छति।
४) तत्थ तस्स विसाखा नाम भगिनी अत्थि।
५) सुनितो च विसाखा च सायं समये विहारं गच्छन्ति।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तत्थ एको | अ) माणवको अत्थि। |
| २) सुनितो राजगहे | ब) आचरियो वसति। |
| | क) पितुं सन्तिकं गच्छति। |

## ४) पराभव सुत्त

सुविजनो भवं होति, सुविजानो पराभवो।
धम्म कायो भवं होति, धम्मदेसी पराभवो।।

निद्दासीली सभासीली,अनुट्ठाता च यो नरो।
अलसो कोधपञ्ञाणो, तं पराभवतो मुखं।।

यो मातरं वा पितरं वा, जिण्णकं गतयोब्बनं।
पहु सन्तो न भरति, तं पराभवतो मुखं।।

जातित्थध्दो,धनत्थध्दो, गोत्तत्थध्दो च यो नरो।
सञ्ञातिं अतिमञ्ञेति, तं पराभवतो मुखं।।

इत्थिधुतो सुराधुतो,अक्खधुतो च यो नरो।
लध्दं लध्दं विनासेति, तं पराभवतो मुखं।।

इत्थिं सोण्डिं विकिरणिं, पुरिसं वा पि तादिसं।
इस्सरियस्मिं ठापेति,तं पराभवतो मुखं।।

### स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणता पुरुष सहजतेने ओळखता येतो?
२) धर्मद्वेषी पुरुषाचे काय होते?
३) आळशी व्यक्तीच्या अधोगतीचे कारण कोणते?
४) आईवडीलांचे पालन पोषण न करण्याने काय होते?
५) कोणती स्त्री अद्योगतीचे कारण होऊ शकते?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) धम्म कायो भवं होति, धम्मदेसी पराभवो।
२) पहु सन्तो भरति, तं पराभवतो मुखं।
३) सञ्ञातिं अतिमञ्ञेति तं पराभवतो मुखं।
४) इत्थिं सोण्डि विकिरणी, पुरिसा वा पि तादिसं
५) अलसो कोधपञ्ञाणो, तं पराभवतो मुखं।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) निद्दासीली सभासीली | अ) गोत्तत्थद्धो च यो नरो। |
| २) जातित्थद्धो धनत्थद्धो | ब) अक्खुधुतो च यो नरो। |
| | क) अनुट्ठाता च यो नरो। |

# ५) गोतमचरियं

हिमवन्तं पस्सतो,कोसलेसु निकेतिनो।
साकिया नाम जातिया, धनविरियेन सम्पन्ना।।

तस्स साकियानं गामे, जनपदे लुम्बिनीवने।
बोधिसत्तो मनुस्सानं हितसुखाय जातो।।

सो सब्बस्स अत्थस्स, सिद्धी कत्ता' ति।
तस्स सिद्धत्थ नाम अकंसु।।

तस्स महेसिनो सुद्धोदननाम पिता।
बुद्धस्स माता पन नामो महामाया।।

मगधेसु उरुवेलायं, बोधिमूले महामुनी।
वेसाखपुण्णिमायं सो, पत्तो सम्बोधिमुत्तमं।।

कुसिनारायं यमकसालानं अन्तरे वने।
वेसाखपुण्णमाय सो, दीपो लोकस्स निब्बुतो ।।

## स्वाध्याय


**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हिमवंत प्रदेशाजवळ कोणते धनसंपन्न राज्य होते?
२) सिध्दार्थाचा जन्म कोणत्या ठिकाणी झाला?
३) बोधिसत्वाचा जन्म कशासाठी होतो?
४) सिद्धार्थास ज्ञानप्राप्ती कोणत्या पौर्णिमेला झाली?
५) सिद्धार्थास ज्ञानप्राप्ती कोणत्या ठिकाणी झाली?
६) बुद्धाचे महापरिनिर्वाण कोणत्या ठिकाणी झाले?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) तस्स महेसिनो सुध्दोदन नाम पिता।
२) कोलिया नाम जातिया,धनविरियेनसम्पन्ना।
३) बोधिसत्तो मनुस्सानं अहितसुखाय जातो।
४) मगधेसु उरुवेलायं बोधिमूले महामुनी।
५) तस्स राहूलो नाम अकंसु।

**३. खालील रेखाजाळे पूर्ण करा.**




**४. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) तस्स सकियानं गामे | अ) नाम अकंसु। |
| २) तस्स सिध्दत्थ | ब) जनपदे लुम्बिनीवने। |
| | क) कोसलेसु निकेतिनो। |

☆☆☆

# परिसिट्ठं पञ्च– कथापुत्ती (कथापूर्ती)

## १) बकजातकं

अतीते एकस्मिं अरञ्ञायतने....... अञ्ञतरं पदुमसरं निस्साय ठिते ....... हुत्वा निब्बति। तदा अञ्ञतरस्मि नातिमहन्ते सरे निदाघसमये ......... मन्दं अहोसि, बहु चेत्थ मच्छ होति। अत्थेको.........ते मच्छे ...... एकेन उपायेन इमे.......वञ्चेत्वा खादिस्सामी' ति गन्त्वा उदकपरियन्ते चिन्तेन्तो निसिदी। अथ तं मच्छा। किं अय्य चिन्तेन्तो निसिन्नोसी' ति पुछंसु। तुम्हाकं........ निसिन्नोम्ही' ति। अम्हाकं किं चिंतेसी......,ति। इमस्मिं सरे उदकं परित्तं,गोचरो च मन्दो.......च महन्तो इदानिमे मच्छा किं नाम करिस्सन्ती' ति तुम्हाकं चिन्तेन्तो..........ति।

(रुक्खदेवता, बोधिसत्तो, बको, उदकं ,दिस्वा, मच्छे, अय्या, चिन्तेन्तो, निसिन्नोम्ही, निदाघो)

## २) नक्खतजातकं

अतीते वाराणसियं ब्रह्मदत्ते ....... कारेन्ते। नगरवासिनो जनपदवासिनं ....... वारेत्वा दिवसं ठपेत्वा अत्तनो कुलूपकं ......... पुच्छिंसु-भन्ते। अज्ज अम्हाकं एका ..........सोभनं नु खो.......न्ति? सो इमे अत्तनो रूचिया ........ ठपेत्वा इदानि मं पुच्छन्ती' ति......अज्ज नेसं मङ्गलन्तरायं.........ति चिन्तेत्वा....... अज्ज नक्खत्तं। सचे करोथ..........पापुणिस्सथ' ति। ते तस्स सद्दहित्वा नागमिंसु।

(धीतरं, रज्जं, मङ्गलकिरिया, आजीविकं, दिवसं, नक्खत्तं, कुज्झित्वा, असोभनं, करिस्सामी, महाविनासं)

## ३) कलहो हि विनासमुलो

अतीते .......... बह्मदत्ते रज्जं कारेन्ते बोधिसत्तो ..... निब्बतित्वा अथेक वट्टकसहस्स......... अरञ्ञे वसति। तदा एको वट्टकलुद्दको तेसं....... गन्त्वा वट्टकवस्सिकं कत्वा तेसं ....... ञत्वा,तेसं उपरि जालं खिपित्वा, परियन्तेसु.......... सब्बे एकतो कत्वा पच्छि पुरेत्वा, घरं गन्त्वा, ते विकिणित्वा, तेन मूलेन.......कप्पेति। अथेकदिवसं....... ते वट्टके आह–अयं साकुणिको अम्हाकं..........विनासं पापेति,अहं एकं उपायं.......।

(जीविकं, परिवारो, वाराणसियं, महन्तो, जानामि, वट्टकयोनियं, वसनट्ठानं, सन्निपतितभाव, ञातके, बोधिसत्तो.)

## ४) सीलविमंसनं

''अतीते वाराणसियं.........रज्जं कारेन्ते बोधिसत्तो.......... निब्बतित्वा वयप्पतो तथेव दिसापामोक्खस्स सन्तिके......... माणवकसत्तानं जेट्ठो हुत्वा सिप्पं......।आचरियस्स वयप्पत्तधीता..........। सो चिन्तेसि इमेसं माणवकानं सीलं ...........सीलसम्पन्नस्सेत...........'' ति। सो एकं दिवसं.........आमन्तेत्वा 'ताता, मय्हं.......... वयप्पता विवाहं अस्सा कारिस्सामि............लध्दुं वट्ठति।

(विमंसित्वा, अत्थि, माणवके, वत्थलङ्कारं, बह्मदत्ते, उग्गण्हि, बाह्मणकुले, दस्सामि, धीता, पञ्चन्न)

☆☆☆

# परिसिट्ठं छ– पालि भाषेचे महत्त्व

भाषा ही देवाणघेवाणीचे साधन आहे. एकमेकांचे विचार, भावना व्यक्त करण्याचे माध्यम आहे. बोली भाषा म्हणजे सर्वसामान्यांना समजणारी, रोजच्या व्यवहारात बोलली जाणारी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना समजणारी भाषा होय. प्राचीन भारतात पालि ही बोलीभाषा होती. त्यामुळे बुद्धांनी जेव्हा धम्म शिकवायचे ठरविले तेव्हा त्यांनी तो सर्वांना समजावे म्हणून तो पालि भाषेत म्हणजेच सर्वसामान्यांच्या भाषेत दिला.

धम्म म्हणजे निसर्गाचा नियम. आपण ज्या सृष्टीत राहतो त्यात घडणाऱ्या घडामोडींचे कारण माहित होणे म्हणजेच ज्ञान प्राप्त होणे असे समजायला हकरत नाही. बुद्धाला जेव्हा सर्व गोष्टींचे ज्ञान प्राप्त झाले तेव्हा त्यांनी ते इतरांना समजून सांगितले, ज्याला आपण धम्म म्हणतो. उदाहरणार्थ आगीचा धम्म आहे जळणे आणि जाळणे. जगात कुठेही असली तरी आग जाळणार आणि जळणारच. मनात आलेला राग, द्वेष तिरस्कार ही सुद्धा आगच आहे, ती आपल्यालाच जाळणार हे सत्य आहे. कारण तो निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे आपल्याला जळायचे नसेल तर आग पेटवायची नाही, पेटली की जळणार आणि जाळणारच. असे सत्य आणि निसर्गाचे नियम जेव्हा बुद्ध सोप्या रीतीने, गोष्टींमधून , उपमा देऊन समजून सांगतात त्यालाच धम्म म्हणतात.

बुद्ध जवळ जवळ ४५ वर्षे धम्म शिकवीत फिरत होते, मिळालेले ज्ञान अत्यंत करूणेने सर्वांना वाटत होते. आपल्याला आता जर बुद्धाने काय शिकविले हे समजून घ्यायचे असेल तर आपल्याला पालि भाषा आली पाहिजे, कारण बुद्धाने ते ज्ञान पालि भाषेत सांगितले आहे आणि म्हणून पालि भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. मनात साठवून जोपासले पाहिजे, कारण ते प्रत्येकाला उपयोगी तर होतेच शिवाय दुक्खातून देखील मुक्त करीत होते. गमतीची गोष्ट म्हणजे बुद्ध धम्म देताना तो सर्वांना लक्षात राहावा म्हणून गोष्टींतून, उपमा सांगून, विविध प्रकारे पाठांतर करून घेऊन लक्षात ठेवायला मदत करायचे. त्यामुळे बोलीभाषेतील हा धम्म सर्वजण समजू शकत तर होतेच पण ते लक्षात ठेवून अनुभवही करू शकायचे. अनुभवयाचे ज्ञान कसे काय विसरता येईल?

उदाहरण द्यायचे झाले तर आपण सर्वांत सोपे उदाहरण घेऊ या. सर्वांनी कमळाचे फुल तर पाहिले असेलच. जेव्हा सर्वजण बुद्धाला विचारायचे की भन्ते! तुम्हांला ज्ञान प्राप्त झाले, तुम्ही बुद्ध झाले म्हणजे काय झाले? बुद्धाने समजवून सांगितले. सांगतांना ते विचारतात की तुम्ही कमळाचे फुल पाहिले का? सर्व म्हणाले– होय. ते कुठे उगवते? चिखलात. फुलाला चिखल लागलेला असतो का? नाही. त्याच्या पानांवर, पाकळ्यांवर पाण्याचा थेंब सुद्धा थांबत नाही आणि ते चिखलातून वर येते, सुंदर असते, तसाच मी आहे. हे जीवन जरी आपल्याला चिखलात मिळाले असले तरी आपण चिखलातल्या कमळासारखे असायला हवे. म्हणून प्रत्येकानी दुक्खातून, दुक्खाच्या चिखलातून वर यायचे आहे, दुक्ख आपल्याला चिटकू द्यायचे

नाही. अशी सुंदर उपमा देऊन बुद्धाने सांगितल्यावर सामान्यांना कळणार नाही असे होणारच नाही.

त्यामुळे सर्वजण बुद्धाचा धम्म अनुसरत आणि आपल्या दुक्खातून बाहेर येत. आपला फायदा झाला, आपण दुक्खातून बाहेर पडलो. दुसऱ्याचा देखील फायदा व्हावा, तो देखील त्याच्या दुक्खातून बाहेत पडावा, असे प्रकर्षाने वाटायला लागते आणि त्यामुळे धम्माचा प्रचार-प्रसार दूर दूरपर्यंत झाला. धम्म पालि भाषेत असल्यामुळे पालि भाषा देखील दूर दूरपर्यंत पोहोचली. धम्माची भाषा म्हणून पालि भाषाच ओळखली जाऊ लागली. धम्म सांभाळून ठेवणारी भाषा म्हणजे पालि असाही तिचा अर्थ झाला.

कालांतराने भाषेमध्ये बदल होत गेले. जवळ जवळ दोन हजार वर्षानंतर बोलली जाणारी पालि आजची मराठी झाली, बंगालमधली बंगाली झाली, गुजरात मधली गुजराती झाली आणि अशा प्रकारे मूळ पालि भाषा परिवर्तित होऊन काळाच्या विस्मृतीच्या पडद्याआड गेली; परंतु बुद्धाचा धम्म असल्यामुळे २५०० वर्षापूर्वीची पालि त्यांच्या शिष्यांनी जतन करून तशीच ठेवली. सम्राट अशोकाने त्याच भाषेत ब्राम्ही लिपीत शिलालेख लिहून तिला लिपिबध्द देखील केले. जसे गुरु - शिष्य परंपरेनुसार मुखोद्गत करून पिढ्यानपिढ्या बुद्धांचा धम्म जपला गेला तशीच पालि भाषाही जपली गेली.

दुर्दैवाने भारतातून बुद्धाचा धम्म लयाला गेला. भाषा विसरली गेली आणि लिपी वाचता येईनाशी झाली. परंतु श्रीलंका, म्यानमार सारख्या आपल्या शेजारच्या देशांनी बुद्धाच्या धम्मासह पालि भाषेचे जतनच केले नाही तर ती भाषा जोपासली, वाढवली आणि दूरवर पसरवली. जगभरातील बौद्ध राष्ट्रांमध्ये अभ्यासली जाणारी पालि भाषा भारतात मात्र परकी आणि नवीन भाषा असल्यासारखी वाटते. पण आपण हे विसरायला नको की पालि भाषा ही आज भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषांच्या आदिभाषेसारखी आहे आणि त्यामुळे आपल्याला खूप जवळची आहे. ऐकताना ओळखीची वाटते आणि कित्येक शब्द तर अगदी बोली भाषेतील वाटतात.

पण पुन्हा प्रश्न पडतो की आता पालि भाषाच कशाला शिकायची? पालि भाषेतील बुद्धाचा धम्म तर इंग्रजीतून, मराठीतून सुद्धा शिकता येतो, समजून घेता येतो. मग पालि भाषाच का शिकायची किंवा जगभरातील लोक आता २५०० वर्षापूर्वीची भाषा कशाला शिकतात किंवा बोलतात किंवा अभ्यासतात? तर त्याचे उत्तर असे आहे की बुद्धाने जो धम्म दिला, जे ज्ञान दिले ते जितके सखोल, सूक्ष्म, गंभीर आहे तितकेच सोपे, सुंदर आणि अतुलनीय आहे, परंतु ते ज्ञान जगातील कोणत्याही भाषेत योग्यप्रकारे भाषांतरीत करता येत नाही. कारण जगभरातील कोणत्याही भाषेत तो शब्दच राहतो त्याचे भाषांतर करता येत नाही ज्याला, ज्ञान प्राप्त झाले, तो अशी त्या शब्दाची व्याख्या करता येते पण भाषांतरित करता येत नाही. त्यामुळे जगातील सर्व भाषेत बुद्धच म्हणतात. संपूर्ण पालि भाषा अशीच असल्यामुळे भाषांतरात फार चुका होतात.

अजून एक उदाहरण बघूया, 'भग्ग रागो, भग्ग दोसो, भग्ग मोहो ति भगवा,' ही पालि भाषेतील भगवा ह्या शब्दाची व्याख्या मराठीतून समजल्यासारखी वाटते. असं वाटतं की सोप तर

आहे. ज्याने आपला राग, दोष आणि मोह भग्न केला तो भगवा. पण ते चुकीचे आहे. पालि मधील राग आणि मराठीतील राग यामध्ये जमीन –अस्मानाचा फरक आहे. पालितील राग म्हणजे मराठीतील लोभ, मोह किंवा आसक्ति तसेच पालितील दोस म्हणजे तिरस्कार, प्रचंड द्वेष आणि मोह म्हणजे अज्ञान, अविद्या किंवा अंधार आणि भग्ग म्हणजे नष्ट करणे, फक्त तोडणे नव्हे.

अजून एक महत्त्वाची गोष्ट पालि भाषेतील शब्दांमध्ये आहे आणि ते म्हणजे पटिवेदन अर्थात अनुभव. पालितील प्रत्येक शब्दाचा अनुभव करता यतो जो इतर भाषांतरित शब्दाचा करता येईलच असे नाही. त्यामुळे मूळ पालि भाषा शिकणे सोपे आहे. 'पा पालेति, रक्खती ति पालि' अर्थात जी पालन करते, रक्षण करते ती पालि. बुद्धवचनांचे पालन करते, रक्षण करते म्हणून पालि.

पालि तिपिटकामध्ये तथागत बुद्धाच्या त्या काळातील चारिकांचा विस्तारने उल्लेख आलेला आहे. अगं, मगध, कासी, कोसल, वज्जी, मल्ल, चेदि, वत्स, कुरु, पांचाळ, मत्स, सौरसेन, अस्मत, अवंती, गांधार, आणि कंबोज या सोळाही जनपदांमध्ये तथागतांनी विचरण केल्याचे आणि पालि भाषेमधून उपदेश केल्याचे उल्लेख आपल्याला पालि साहित्यात आढळून येतात, म्हणजे तथागत बुद्ध जिथे- जिथे जात तिथे तिथे ते पालिमध्येच उपदेश देत असत आणि तेथील लोक सुध्दा तथागत बुद्धांच्या उपदेशांना ऐकत असत, समजून घेत असत व ग्रहण करीत असत.

तथागतांनी स्वतः पहिल्यांदा कुठे बौद्धिक विकास केला, त्यांनी उच्चतम अशा स्वरूपाचे ज्ञान प्राप्त केले, विशुद्ध आचरण केले, त्यांनी आपल्या मनातील सर्व विकारांना नाश करून संपूर्ण मानवतेप्रति प्रेम, दया, करूणा, मैत्री, मुदिता, उपेक्षा, मानवी संवेदनशिलता निर्माण करून लोकांना दुक्ख मुक्तीवर मार्ग सांगितला. ते आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी बुद्धत्वाला प्राप्त करून निरंतर ४५ वर्षापर्यंत आपल्या धम्म विचारांचा उपदेश लोकांना देत राहिले. त्यांचा तो उपदेश म्हणजेच पालि साहित्य होय, तिपिटक साहित्य होय.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करावयाचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे – परियत्ति, पटिपत्ति व पटिवेदन. परियत्ति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे. पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा, विचार-विमर्श करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे पालिमधील शब्दांची असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही, तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययानाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही की, इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा- कथन इत्यादी पुरताच मर्यादित असतो; परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते, तिला 'नवांगसत्थुसासन' असे सुद्धा म्हणल्या गेलेले आहे. ते म्हणजे –

१) सुत्त २) गेय्य
३) वेय्याकरण ४) गाथा
५) उदान ६) इतिवुत्तक
७) जातक ८) अब्भूतधम्म आणि
९) वेदल्लं (जाणून घेणे).

म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने

उपलब्ध आहेत. आज पालि साहित्य सुद्धा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

पालि भाषा शिकण्याच्या दृष्टीने व समजण्याच्या दृष्टीने सोपी आहे. मोग्गलायन व्याकरणानुसार पालि भाषेमध्ये अक्षरांची संख्या ४३ आहे व कच्चायन व्याकरणनुसार ४१ आहे. मोग्गलायन व कच्चायन व्याकरणामध्ये अक्षरांच्या संख्येमध्ये हा जो फरक पडलेला आहे, तो पालिमधील व्यंजन संख्येमध्ये नसून पालिमधील स्वरांच्या संख्येमध्ये आहे. या भाषेमध्ये व्याकरण सूत्रांची संख्या सुद्धा ७००/८०० पेक्षा जास्त नाही. म्हणून आधुनिक भाषाशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा या भाषेला फार महत्त्व आहे.

पालि भाषेचा अभ्यास करताना पालि भाषा ही मराठी, हिंदीच्या जवळची आहे असे जाणवते. व्याकरणाचा भाग सोडून दिला तर अनेक शब्द मराठी-हिंदी भाषेमध्ये पहायला मिळतात. उदा. सदा, परम, सुकर, अहित, यदा-कदा, अङ्गार, सीत, थूल, अङ्गुली, वेसभूसा, जननी, मुट्ठी, नगर, नुतन इत्यादी. पालि भाषा अधिक सोपी करावयाची असेल तर पालिमधील शब्द आपण मातृभाषेत बोलतांना रूढ केले पाहिजे. उदा. प्रमुख-पमुख, निर्वाण-निब्बान, दुर्लभ - दुल्लभ, वर्ष - वस्स, अग्नि-अग्गि, सर्व-सब्ब, नित्य-निच्च, पुस्तक-पोत्थक, विद्यालय - विज्झालय, क्लेश-किलेस, औषध-ओसध, मार्ग-मग्ग इत्यादी. म्हणून पालि भाषा शिकतांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे? ती आपल्याला कशा पद्धतीने बोलता येईल? ती व्यवहारामधील बोलचालची भाषा कशी होईल? यादृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण पालि व्याकरणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेची स्वतंत्र व्याकरण परंपरा आहे. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्वज्ञान, इतिहास, जीवनमूल्ये समजून घेण्याच्या दृष्टीने पालि भाषेचे फार महत्त्व आहे. प्राचीन भारताचा इतिहास, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, भूगोल, सांस्कृतिक देवाण-घेवाण, भूभाग इत्यादींना समजून घेण्याच्या दृष्टीने सुद्धा पालि भाषेच्या अध्ययनाचे महत्व आहे.

मानवी जीवनात निर्माण होणारी दुक्ख हे आपल्या अज्ञानामुळे अविचारामुळे निर्माण होतात. प्रज्ञाबुद्धीने, विवेकबुद्धीने न वागल्यामुळे निर्माण होतात, पालि भाषेमधील हा धम्मविचार इहवादाला स्विकारणारा आहे, मानवतावाद निर्माण करणारा आहे.


पालि हा विषय इयत्ता आठवीपासून तर पदवी, पदवीव्युत्तर पर्यंत शिकविला जातो. तसेच या विषयात संशोधनही केले जाते. दिवसेंदिवस या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे दिसत आहे. सध्या हा विषय महाराष्ट्रामधील अनेक शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. यामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर, गडचिरोली, अमरावती, औरंगाबाद, सोलापूर, नांदेड इत्यादी विद्यापीठांमध्ये शिकविला जातो. या विद्यापीठांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे जाणवते. याचे कारण हे आहे, की या विषयामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही जीवनमूल्ये, सामाजिक

मूल्ये शिकविली जातात. त्यामुळे प्रत्येकाला शिकविताना या विषयाचे महत्त्व सांगताना हा विषय संविधानिक पद्धतीने सांगता येतो. यामुळे असे म्हणता येईल की, पालि विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये भारतीय संविधानिक मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने सुद्धा अतिशय महत्त्वाचा विषय आहे.

पालि विषयाच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेला आहे. भारतातील विविध विभागीय शिक्षण मंडळ (एस. एस.सी, एच.एस.सी.) तसेच अनेक विद्यापीठांमध्ये हा विषय शिकविला तर जातोच, परंतु जगातील अनेक देशांमध्ये सुद्धा हा विषय शिकविला जातो. तिसऱ्या संगितीपासून याची सुरुवात झाली. आज या भाषेचा अतिशय मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार देश-विदेशांत होत आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रीलंका, थायलंड, बांगला देश, चीन, जपान, कंबोडिया, म्यानमार इत्यादी अनेक देशांचा उल्लेख करता येईल.

☆☆☆

# परिसिष्टं सत्त – भारतातील अशोक कालीन शिलालेखातील अक्षरे



मौर्यसम्राट् अशोकाच्या गिरनार लेखातील लिपी इ. पू. तिसरे शतक